दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● सोमवार ८ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३२७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक
मो.न.9422660077

# शेतकरीपुत्राची गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत धाव.



**वादळवार्ता/विशेष**

बजरंग सोनवणे हे नाव ६ जुलै १९७० साली सामान्य घरात जन्माला आले. वडील हाडाचे शेतकरी. यामुळे कष्टाशी आणि शेतीशी जवळून संबध आलेला. पण शेतीसोबत समाजकारण, राजकारणही हवे असा विचार मनात घोळू लागला. यातूनच बजरंग बप्पांनी राजकारणात यायचा निर्णय घेतला. आपले 'प्रारब्ध' आपणच ठरवू, असे म्हणत हा शेतकरी पुत्र अवघ्या पंचविसाव्या वर्षी गावच्या राजकारणात उतरला. पहिल्याच निवडणूकीत त्यांना विजयाचा टिळा लागला आणि तिथून पुढे त्यांनी राजकारणात कायम चढत्या क्रमाने मार्गक्रमन केले. उपसरपंच ते खासदार ही वाटचाल थक्क करणारी आहे... बजरंग सोनवणे पहिल्यांदा गावच्या राजकारणात आले. पहिल्याच प्रयत्नात ते उपसरपंचही झाले. यानंतर त्यांच्यावर शरदचंद्र पवार यांच्या विचाराचा प्रभाव पडला. त्यामुळे त्यांनी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी घेतली. सन २००७ मध्ये जिल्हा परिषद निवडणूक लढवली. यात त्यांना गुलाल लागला. यापढे त्यांचे आणि गुलालाचे नाते अजूनच घट्ट झाले. २०१२ ला पुन्हा एकदा युसुफवडगावमधून जिल्हा परिषद सदस्य झाले. जिल्हा परिषद सदस्यत्वाची हॅट्रिक करत चिंचोलीमाळीमधून २०१७ ला सलग तिसऱ्यांदा निवडून आले. इकडे लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी पार पाडताना राष्ट्रवादीने त्यांच्यावर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. यानंतर केजपर्यंत मर्यादित असलेले बजरंग सोनवणे जिल्ह्यात पोहचले. पदावर असताना त्यांनी जिल्हाभर संपर्क वाढविला. हक्काची माणसे उभा केली आणि त्यांना 'आपला माणूस' हा विश्वासही दिला. राजकारण करताना आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात अच्छे दिन यावेत, यासाठी साखर कारखाना उभा करण्याचे धाडस केले. जिथे भल्याभल्यांना कारखाने चालविणे शक्य झाले नाही, अशा दुष्काळी जिल्ह्यात कारखाना उभारणीचे काम हाती घेतले. अवघ्या ९ महिन्यात त्यांनी कारखाना उभारला आणि शेतकऱ्यांसह कष्टकऱ्यांच्या हाताला काम देऊन हजारो चुली पेटविण्याचे काम केले. बीड जिल्ह्यात ७० टक्के क्षेत्रावर कापूस लागवड होत होती, मात्र, सोनवणे यांनी यडेश्वरी कारखान्याच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्राच्या तोडीस तोड ऊसाला भाव दिल्याने कापूस उत्पादक शेतकरी ऊसाकडे वळले. पुर्वी गोड ऊसाची कडू कहानी या भागात होती, तिच कहानी गोड करून दाखविण्याचे काम सोनवणेंनी करून दाखविले. बीड जिल्ह्यात सर्वाधिक उसाला भाव देण्याचा विक्रमही बप्पांच्या नावे आहे. अजून तरी ऊस दराच्या बाबतीत बरोबरी करू शकलेले नाही. याच कारणाने त्यांना शेतकरी पुत्र ही बिरूदावली शेतकऱ्यांनीच लावली. याच कारखान्यात अत्याधुनिक आणि स्वयंचलित असणारा इथेनॉल निर्मितीचा पहिला प्रकल्प देखील बप्पांच्याच पुढाकाराने उभारला. सामाजिक क्षेत्रामध्ये येडेश्वरी फौंडेशन मार्फत बजरंग बप्पा सोनावणे अनेक समाज उपयोगी कार्यक्रम राबवत असतात. सन २०१९ साली बजरंग सोनवणे यांनी लोकसभेची निवडणूक लढवविण्याची जबाबदारी स्वत: शरदचंद्र पवार यांनी बप्पावर टाकली होती. त्यांनी या निवडणूकीत ५,०९,८०७ (पाच लाख नऊ हजार आठशे सात) मते घेतली, पण पराभव पत्कारावा लागला. हा पराभव जनतेने केला आहे आणि तो हसत हसत स्विकारला पाहिजे, एका पराभवातून खचून न जाता किंवा कसलीही चिडचिड न करता पुन्हा ते कामाला लागले. जिल्हाभर आपले नेटवर्क तयार करणे सुरूच ठेवले. परंतु हे करताना पक्षातील लोकांच्या डोळ्यात हे येणार नाही, याची काळजी घेतली. दरम्यान, त्यांच्याकडे जिल्हा परिषदेत शिक्षण सभापतीपद आले. या माध्यमातून गरिबांची लेकरं शिकली पाहिजेत, त्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी प्रमाणिक प्रयत्न सुरू केले. यातून'माझी शाळा सुंदर शाळा' अभियान पुढे आले. जिल्हा परिषद अंतर्गत सर्व शाळा डिजीटल करून त्यांचा कायापालट आणि खऱ्या अर्थाने उध्दारच केला. त्यांच्याच पुढाकाराने ज़िल्हा परिषद शाळांसाठी तयार केलेले माझी शाळा हे अँप विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरलेच पण याची राज्याने दखल घेतली. कोविडच्या काळात प्रत्येक जण घराचे दार लावून बसलेला असताना बजरंग बप्पांनी याच जिल्ह्यातील लोकांचे जिव वाचावेत, यासाठी जिवाचे रान केले आणि येडेश्वरी कारखान्यातील इतर उत्पादन थांबवून सॅनेटायझरचे उत्पादन सुरू केले. त्यातून अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झाला. शिवाय बीड बरोबर संपूर्ण महाराष्ट्रभर सॅनेटायझरचे वाटपही केले. दरम्यान, मध्यल्या काळात त्यांना घेरण्यासाठी पक्षातील घराणेशाहींनी सुरूवात केली. त्यांची करता येईल तितकी आडवणूकही करण्यात आली. यामुळे काही काळ ते राजकारणापासून अलिप्त दिसत परंतु तसे नव्हते. या काळात बप्पांनी गावागावात हक्काची माणसे जोडली. राजकारणा पलिकडे जाऊन लोकांचे सुख दूख जाणून घेतले. दरम्यान, लोकसभा निवडणूकीचे वारे वाहू लागल्यानंतर बजरंग बप्पावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे फोन येऊ लागले. तुम्ही निवडणूक लढाच अशी मागणी होऊ लागली. परंतु यावेळी बप्पा अजित पवार गटात होते आणि आपण पुन्हा शरदचंद्र पवार यांच्यासोबत पडत्या काळात जाऊन लढले पाहिजे, असा निर्णय त्यांनी घेतला. निर्णय घेताच जिल्ह्यातील काही नेत्यांनी प्रारब्धाच्या गोष्टी रंगविण्यास सुरूवात केली. मात्र, बजरंग सोनवणे हे प्रारब्धाचे धनी आहेत याचा विसरही त्यांना पडला होता. निवडणूकीला सुरूवात झाली. बजरंग सोनवणेंची औकात काढण्यात आली. लायकीपर्यंत विरोधक घसरले मात्र, इतक्याही काळात समोर शेकडो पुढाऱ्यांची फौज असताना बजरंग सोनवणे हे सामन्य कार्यकर्त्यांना सोबत घेवून लढले. येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला भिडले आणि हरेक आरोपांनाही तोडलेही. समोर बलाढ्य ताकद, अफाट धन आणि हाती असलेल्या सत्तेचा गैरवापर होत असताना बप्पांनी धिर सोडला नाही. गावागावात गेले. रात्रीचा दिवस केला आणि भेटलेल्या प्रत्येक माणसाला आपलेसे केले. यातूनच दि.४ जून रोजी त्यांच्यावर गुलाल पडला. याच गुलालात त्यांनी आपली औकात दाखवून देत दिल्ली गाठली. माझ्यासारख्या कार्यकर्त्यांच्या तोंडून एकच वाक्य आले "याचसाठी केला होता अट्टाहास". मतदान झाल्यानंतर ४ दिवसांनी बप्पा व सारिकाताईंचा फोन आला, "बाळा, खूप कष्ट घेतलेस" या एका वाक्याने निवडणूकीत घेतलेल्या कष्टाचे चीज झाले. निकालानंतर खासदारांसोबत सर्वप्रथम दिल्लीवारी घडली त्याचेही अप्रुप व अभिमान माझ्यासारख्याला आहेच. पक्षप्रवेशाला आडकाठी, तिकीट मिळेपर्यंत धाकधूक, अर्ज भरायला मोठा नेता नाही, मतदानात "पिपाणी" चिन्ह, निकाल लागल्यानंतरही २ तास प्रमाणपत्र मिळाले नाही. आयुष्यभराची मेहनत पणाला लावली होती पण योद्धयाने संघर्ष केला, विजयी झाला. या लढवय्या शेतकरी पुत्राच्या संघर्षाला सलाम !



## राज ठाकरे यांना दिलासा, 16 वर्षांपूर्वीच्या गुन्ह्यातून मुक्तता

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची 16 वर्षांपूर्वीच्या गुन्ह्यातून मुक्तता करण्यात आली आहे. या खटल्यात त्यांना दोन वेळा वारंट बजावण्यात आले होते. सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर न्यायालयाने हा निकाल दिला आहे. 2008 मध्ये शेंडगेवाडी येथे मनसेने रेल्वे भरतीच्या मुद्यावरुन आंदोलन केले होते. त्या आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. या खटल्याप्रकरणी राज ठाकरे यांना शिराळा न्यायालयाकडून दोन वेळा अजामीन पत्र वॉरंट बजावण्यात आला होता. आता या गुन्ह्यातून राज ठाकरे यांची मुक्तता झाल्याची माहिती मनसे जिल्हा अध्यक्ष तानाजी सावंत यांनी दिली. काय होते प्रकरण

सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील शेंडगेवाडी येथील हा गुन्हा आहे. रेल्वेत मराठी उमेदवारांची भरती करण्याच्या प्रकरणात मनसेने 2008 मध्ये आंदोलन केले होते. त्या आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. दगडफेकही झाली होती. यामुळे या प्रकरणात मनसे अध्यक्ष राज ठाकरे, सांगलीचे मनसे जिल्हाप्रमुख तानाजी सावंत यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. या खटल्याचा निकाल इस्लामपूर न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाने शिराळ्यातल्या गुन्ह्यातून राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता केली आहे. मनसेकडून या गुन्हातून राज ठाकरें याचे नाव काढण्याचा अर्ज इस्लामपूर न्यायालयात करण्यात आला होता.

राज ठाकरे यांना या प्रकरणात अजमीनपत्र वारंट दोन वेळा बजावण्यात आले होते. तो रद्द करण्याची विनंती केल्यानंतर न्यायालयाने तो वारंट रद्द केला होता. रेल्वेत भरती होत असताना परप्रांतीय उमेदवारांची निवड होते. रेल्वेच्या जाहिराती स्थानिक वृत्तपत्रात न देता इतर राज्यात दिल्या जातात, असे आरोप करत सन 2008 साली मनसेने आंदोलन केले होते. त्यावेळी राज्यभर मनसेने हे आंदोलन चांगलेच गाजले होते. या आंदोलनामुळे कल्याणमध्ये राज ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल होऊन त्यांना अटकही झाली होती. त्याचे पडसाद राज्यभरात उमटले होते. मनसेकडून ठिकाणी आंदोलन झाले होते. सांगली जिल्ह्यातील शेडगेवाडी या ठिकाणी मनसे बंद पुकारला होता. त्याला हिंसक वळण लागले होते. त्यामुळे राज ठाकरे आणि इतरांवर गुन्हा दाखल झाला होता.

# नामघोष

पावसाळ्याची सुरवांत झाली की, लगेचच वेध लागतात ते आषाढी एकादशीचे, विठुमाऊलीच्या ओढीने पाऊले पंढरीची वाट धरतात. वारकरी संप्रदाय, महाराष्ट्रांतील अद्वैतदर्शन घडवणारी परंपरा, माणुसकीचा झरा इथेच वाहतो, भक्तांची मांदियाळी जमते. जल भरलेले मेघही बुक्क्याचा रंग धारण केलेले असतात. प्रतिवर्षी मैलोनमैल चालताना वारीतील टाळमृदंगाचा एकत्रित नांद भक्तिरसांत मनांला आपोआप ओढून घेतो. एकमेकांच्या होणाऱ्या भेटीगाठी पूर्णपणे अनोळखी असतात पण नाते वारकऱ्यांचे असते, माणसांमाणसांत देव पाहिला जातो. कोणताही भेदभाव नाही, थाटमाट नाही अशातच एकमेकांचे चरणस्पर्श केले जातात. कपाळी चंदनाचा टिळा, खांद्यावरची पताका, डोईवरील तुळस म्हणजे पावित्र्याचा ठेवा, वातावरण सुगंधीत करत ही वाटचाल सुरूच राहते. हरिनामांत दंग असणाऱ्या प्रत्येकाचे डोळे मात्र विठुरायाच्या दर्शनासाठी आसुसलेले असतात, जसा माऊलीच्या भेटीसाठी जीव आतुरलेला असतो. अठ्ठावीस युगे कटीवर हात ठेवून भक्तांची वाट पाहणारा विठोबा नामघोषांत क्षणांक्षणांला भेटतो. कष्टाच्या आयुष्यांत सुखाचे चांदणे पसरवत असतो, दृष्टादृष्ट भेटीत डोळे भरून वाहतात. शब्दांतीत वर्णनाच्या पलीकडील ही भक्ती अनमोल देणगी आहे. कुटुंबांमध्ये विविध प्रकारच्या प्रथा-परंपरा पाळल्या जातात त्यांतील एक म्हणजे पंढरीची वारी याचा उल्लेखही केला जातो. “वारकरी आहोत, माळकरी आहोत” त्यांत कुणांला दुखावण्याचा हेतू नसतो, पण सात्विकतेची ओळख पटते. वृद्धत्वाची चाहूल लागते, पाऊल थकते तरी वारी चुकवायची नसते, भक्तीतील शक्तीपुढे आपोआप कर जोडले जातात. चढाओढीचा लवलेश नाही की स्पर्धेचा मागमूस नाही, सद्विचारांनी ओथंबलेले मन फक्त दिसून येते. संस्कृत भाषेचा पगडा ज्या काळामध्ये होता त्यावेळी सामान्य माणसांला मराठीतून अध्यात्मज्ञान प्राप्त करून दिले ते तत्वज्ञ, श्रेष्ठ संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रसिध्द रचना म्हणजे, ‘ज्ञानेश्वरी’, ‘अमृतानुभव’, ‘चांगदेवपासष्टी’, ‘अभंगगाथा’, या आहेत. निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई हे संतशिरोमणी या संप्रदायाची ठेव आहे. संत एकनाथ, संत नामदेव, संत तुकाराम, संत जनाबाई, सावता माळी, नरहरी सोनार, विसोबा खेचर, कान्होपात्रा या सगळ्यांचे समाजाप्रती कार्य वेगळे होते पण भक्तिभाव एकच होता पांडुरंगाची सेवा. भारूड, आख्यान, ओव्या, अभंग यांतून समाजहितोपदेश आहे. सण, समारंभाचे औचित्य साधून तत्कालीन समाजांत हे विचार प्रवचनांतून मांडले जायचे, अध्यात्मिक बैठकीतून विचारांची देवाणघेवाण चालायची. संत नामदेव उत्तरेकडे यात्रा करता करता पंजाबात गेले, तिथला समाज त्यांना आवडला. त्यांच्यासाठी ते हिंदीतून अभंग रचू लागले. गुरूदासपूर जिल्ह्यांतील ‘घुमान’ नांवाच्या गांवी आले, भाषा वेगळी असली तरी भक्तीची साधना एकच होती. कथाकिर्तने होऊ लागली, यांतून पंजाबच्या जनांची नामदेवांवर असलेली श्रद्धा दिसून येते, शीख समाजाने संत नामदेवांच्या अनेक अभंगांचा ‘ग्रंथसाहेब’ मध्ये समावेश केला आहे. ‘घुमान’ ही संत नामदेवांची कर्मभूमी मानली जाते, कारण बरेच वर्षे अगदी वृद्धापकाळापर्यंत त्यांचे वास्तव्य तिकडे होते. वारकरी पंथासाठी आषाढी एकादशी व कार्तिकी एकादशी या दोन्हीचेही महत्व आहे. दैवत श्रीविठ्ठल हे श्री भगवान विष्णुंचेच रूप मानले जाते आणि या दोन्ही एकादशींमधला जो कालावधी आहे तो चातुर्मास म्हणून पाळला जातो. व्रतवैकल्यांची परंपरा जपत जीवनानंद घेता येतो. वारीची पायवाट सोपी नाही आषाढातील पर्जन्यवृष्टी अंगावर झेलत, अलोट जनसमुदाय मार्गक्रमण करत असतो. टाळ, मृदंगाच्या साथीत दैवाशी, नशीबाशी चाललेली लढाई थोडा काळ तरी विसरली जाते. महाराष्ट्रांच्या दऱ्याखोऱ्यांत राहणारा तो कैलासाधिपतीही या विठुरायाच्या, माउलीच्या रूपांत भेटतो. हा अनुपम सुखसोहळा, या महासागरांतील एक थेंबही जीवनांत गारवा देईल. ही संत परंपरा महाराष्ट्र भूमीला जी लाभली आहे, ती अमृतवर्षावाच्या रूपाने भक्तीरसांतील अखंडता वर्षानुवर्षे पिढ्यांनपिढ्या शिकवत राहील. सत्य मात्र हेच निदर्शनांस येते, “ब्रह्मानंदी देह भुलुनिया जाई, एक एक खांब वारकरी होई ||”

©मेघनुश्री [लेखिका,पत्रकार]
भ्रमणध्वनी : ७३८७७८७५१२

## ते तर सरकारचे मुकादम, मनोज जरांगे पाटलांचा छगन भुजबळांवर पुन्हा हल्लाबोल, अजून दौऱ्याचे पाच टप्पे बाकी, सरकारला सूचक इशारा

मनोज जरांगे पाटील सध्या मराठा आरक्षण शांतता रॅलीच्या माध्यमातून मराठवाडा पिंजून काढणार आहेत. शनिवारी हिंगोलीपासून त्यांच्या रॅलीचा श्रीगणेशा झाला. आज ते परभणीत दाखल झाले आहेत.त्यांनी सरकारला 13 जुलै या डेडलाईनची आठवण पण करुन दिली. त्यापूर्वी त्यांनी छगन भुजबळांसह राज्य सरकारवर बोचरी टीका केली. त्यामुळे विधानसभेपूर्वी यावर रीतसर तोडगा निघाला नाही, तर हा विषय राज्य सरकारची डोकेदुखी वाढवणार असे दिसते. भुजबळ तर मुकादम

मराठा आरक्षणाविषयी बोलताना काही जणांचे त्यात आमचे पण, त्यांचे पोट दुखत आहे, असा टोला जरांगे पाटील यांनी लगावला. आपल्या नेत्याला काही आमिष दिले का, काय सर्व जाती धर्माचे लोक आता कामाला लागले आहेत. छगन भुजबळ हे मुकादम आहेत. तेच सर्व करत आहेत. कुणबी आणि मराठा एक आहे. त्यांनी बाकीच्या जाती पोट जाती म्हणून घातल्या आहेत. भुजबळ यांना सरकार




सांगत म्हणून ते आम्हाला त्रास देत आहेत, असा आरोप जरांगे पाटील यांनी केला. पत्रकार परिषदेत त्यांनी अनेक विषयावर रोखठोक भूमिका मांडली. ओबीसींचे सहकार्य प्राध्यापक लक्ष्मण हाके यांना विरोधक मानत नाही. हे जे काही घडविण्याचे काम सुरु आहे, त्यामागे भुजबळ असल्याचा आरोप त्यांनी केला. छगन भुजबळ जे करतायत ते सामान्य लोकांना चांगलं वाटत नाही. आमच्या नोंदी सापडलेल्या असताना नाही म्हणणं, मराठ्यांच्या नोंदी सापडलेल्या असताना आपला नेता मराठ्यांना का आरक्षण द्यायचं नाही म्हणतो असं सामान्य ओबीसी लोकांना वाटतंय म्हणून ओबीसी आंदोलनात सहभागी होत असल्याचा दावा त्यांनी केला.

आम्ही मागणीवर ठाम

आमची कोणतीही मागणी बदललेली नाही. भुजबळ यांनी 10-20 लोक हाताशी धरले आणि त्यांना ते बोलायला लावतायत. आमच्या आरक्षणामुळे धनगर समाजाच्या आरक्षणाला धक्का लागत नाही. देव जरी आला तरी धक्का लागत नाही. तुम्ही ST आरक्षणासाठी लढा तुमच्या पाठीशी मनोज जरांगे आधी उभा राहील. कुणबी मराठा एकच आहे त्यामुळे ओबीसीतून आरक्षण देण्याची पहिल्या दिवसापासून आमची मागणी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ओबीसीच नाही तर मराठ्यांना पण पाडा विधानसभेसाठी 288 उमेदवार उभे करायचे ठरले तर सगळ्या जाती धर्माचे लोक उभे करणार, सगळ्या जातीचे उभे राहू द्या. ओबीसींच्याच नाही मराठ्यांना त्रास देणाऱ्या मराठ्यांच्या नेत्यांना देखील पाडा, मराठ्यांना त्रास व्हायला नको, अशी जाहीर भूमिका त्यांनी घेतली. 288 निवडून द्यायचे की पाडायचे हे अजून ठरायचे आहे अजून 5 टप्पे दौऱ्याचे बाकी आहे. 57 लाख नोंदी सापडल्यात,तरी दीड कोटी मराठा आरक्षणात गेला आहे या आंदोलनामुळे 10 टक्के आरक्षण मिळालेलं आहे पण हे टिकणार नाही त्यामुळे आमचा लढा सुरू आहे, असे त्यांनी सरकारला ठणकावले.

## मराठा आणि ओबीसी आरक्षणासंदर्भात उद्या मुंबईत सर्व पक्षीय बैठक, निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर सरकार लागले कामाला

एकीकडे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपला शांतता मोर्चा सुरु केला आहे. हिंगोलीनंतर मराठवाड्यातील अनेक शहरात मनोज जरांगे पाटील यांची यात्रा प्रवेश करीत आहे. आज परभणीत मराठा समाजाची रॅली पोहचली आहे. मराठा आरक्षण आंदोलनानंतर मराठवाडा भयंकर संवदेनशील झाला आहे. येथे लोकसभेत भाजपाचे दोन नेते खासदारकीची निवडणूक हरले आहेत. बीड येथून पंकजा मुंडे आणि जालनातून माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचा आश्चर्यकारक पराभव झाला आहे. त्यातच सर्वौच्च न्यायालयात ओबीसी आणि मराठा आरक्षणा संदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिकांवर निकाल प्रलंबित आहे. त्यातच आता मराठा आणि ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्वपक्षीय बैठकीचे उद्या मुंबईत आयोजन केले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही बैठक बोलावली आहे.राज्यात मराठा आणि ओबीसी समाजात वितुष्ट निर्माण झाल्याने आरक्षण संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्या महत्वाची बैठक बोलावली आहे. या बैठकीला सर्व राजकीय पक्षाचे नेते उपस्थित राहणार आहेत. मराठा आणि ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्व राजकीय पक्षांचे मत आजमावून पाहीले जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बैठकीला राष्ट्रवादी पक्षाचे नेते शरद पवार, उद्धव ठाकरे आणि



राज ठाकरे यांनाही आमंत्रण दिले आहे.जरांगे यांची डेडलाईन राज्य सरकारला 13 जुलैपर्यंत मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देणारा सगे-सोयऱ्याचा अध्यादेश काढण्यासाठी डेडलाईन दिली आहे. सगे सोयरे अध्यादेशाच्या विरोधात मंत्री छगन भुजबल आणि मनोज जरांगे यांचे वाद सुरु आहेत. छगन भुजबळ यांनी ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण देऊ नका अशी मागणी केली आहे. मराठ्यांच्या कुणबी म्हणून 56 लाख नोंदी सापडल्या आहेत. तर कुणबी म्हणून एक कोटीहून अधिक मराठ्यांना जात प्रमाणपत्र मिळाली आहेत. या सर्वपक्षीय नेत्यांना आमंत्रण

सगे सोयरे अध्यादेशाच्या विरोधात आणि बाजूने अशा आतापर्यंत एकूण 8 लाख हरकती राज्य सरकारकडे आल्या आहेत. हा डाटा गुप्त असल्याने उद्याच्या बैठकीत मांडला जाणार नाही असे म्हटले जात आहे. या सर्वपक्षीय बैठकीला शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, प्रकाश आंबेडकर यांच्यासह प्रमुख नेते मंडळींना उपस्थित राहण्याचे निमंत्रण सरकारने दिले आहे.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सोमवार पासून

# पाटोदा तालूक्यात प्रत्येक गावात फॉर्म भरुन घेण्याची व्यवस्था-दिपक घुमरे

**पाटोदा/प्रतिनिधी**
मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना पाटोदा तालुक्यात सक्षम पणे राबवा असे आदेश या समितीचे मतदार संघाचे अध्यक्ष आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी दिले असून तालुक्यातील प्रत्येक गावात हे फर्म भरण्याची व्यवस्था केल्याने माता भगिनींची सोय होणार आहे प्रत्येक गावात प्रश्नाच्या वतीने हि योजना राबण्यात येत असून सोमवार मंगळवार , बुधवार , तीन दिवस प्रत्येक गावात हे कॅम्प राबवण्यात येणार असून कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण हि योजना तालुक्यातील प्रत्येक गावात कार्यकर्त्यांनी सामान्य जनते पर्यंत घेऊन जावी या योजनेचे प्रत्येक गावात ऊपलब्ध करून देण्यात येणार आहे सोबत फॉर्म मोफत उपलब्ध करण्यात आले असून भरताना खालील कागदपत्रे घेऊन यावीत रेशन कार्ड , मतदार ओळख पत्र , शाळा सोडल्याचे प्रमाण , जन्म प्रमाणपत्र या पैकी कोणतेही एक ओळखपत्र , ग्राह्य धरण्यात येईल अशी माहिती राष्ट्रवादी ता अध्यक्ष दिपक घुमरे यांनी दिली आहे

## ऊसतोड मजुरांचा दिवसा खून बोरखेड गावात पाच वर्षात तिसरा खून.

**बीड/ प्रतिनिधी**
बीड तालुक्यातील बोरखेड गावातील इस्माईल सत्तार तांबोळी याने ऊसतोडी संपल्यावर गावात पम्मरचे दुकान चालू केले होते. ऊसतोडीची उचल बाकी असल्याने मुकादम व काही लोकांनी त्याच्या दुकानावर जाऊन पैशाची मागणी केल्याने बाचाबाची झाल्याचे गावातील नागरिकांनी पाहिले होते. त्यानंतर त्याला लिंबागणेश येथील एका धाब्याच्या मागे नेऊन ठार मारल्याचे सांगण्यात येते. सायंकाळी महीला शेतामधून परतत असताना काही मृतदेह पाहिला असता आरडा ओरड करत जवळ असलेल्या पंप चालकाला सांगून याची माहिती नेकनुर पोलिसांना



दिल्यावर पोलीसानी घटनास्थळी जाऊन मृतदेहाचा पंचनामा केला असता म्रत बोरखेंड येथील असल्याची माहिती मिळाली असून इन कॅमेरा शिवविच्छेदनासाठी मृतदेह आंबेजोगाईला पाठवण्यात आला. दिवसाढवळ्या खून झाल्याने एकच खळबळ उडाली. याप्रकरणी इब्राहिम तांबोळी यांच्या फिर्यादीवरून तिघा विरोधात निघून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या खुनाचा तपास पोलीस ठाण्याचे निरीक्षक गोसावी करत आहेत.

## अंबाजोगाईत अश्व रिंगण सोहळा संपन्न नागरिकांनी एकच केली गर्दी



**अंबाजोगाई/प्रतिनिधी**
संत नामदेव व संत जनाबाई यांच्या पालखी (दिंडी) चे शनिवारी सायंकाळी ५ वाजता अंबाजोगाई येथे आगमन झाले. यावेळी पारपडलेल्या रिंगण सोहळा पाहण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केली होती.
दि.६ जून शनिवार रोजी येथील योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानावर संत नामदेव व संत जनाबाई पालखीचे आगमन झाल्यानंतर विठ्ठल नामाच्या जयघोषात अश्व रिंगण सोहळा रंगला होता. यावेळी महिला,पुरुष व बाल वारकऱ्यांनी मनोरे तसेच कुस्तीमुळे उत्साह सिंगेला पोहोचला होता. प्रत्येक जण भगवा पताका हाती घेतल्याने भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. वारकऱ्यांनी अश्वाचे गोड रिंगण धरल्यानंतर माऊली माऊली ... असा नामच्या जयघोषणात अश्व रिंगणात फिरण्याचा वेग धरला. यावेळी अनेकांचे डोळ्याचे पारणे फिटले. रिंगण सोहळा बघण्यासाठी शहर व परिसरातील नागरिकांनी एकच गर्दी केली होती.
संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी उपस्थित महाराज व वारकऱ्यांचे स्वागत केले. यावेळी आमदार नमिता मुंदडा,अक्षय मुंदडा, किसन महाराज पवार, बाबा महाराज जळगावकर, दिलीप सांगळे,सुलोचना सांगळे, दिलीप गीते,प्रकाश बोरगावकर, बळीराम चोपणे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### सर्व दिंडी एकत्र करण्यासाठी प्रयत्न करणार नंदकिशोर मुंदडा

अंबाजोगाई शहरातून विदर्भ, मराठवाडा व परिसरातून जवळपास २७४ दिंड्या पंढरपूरकडे जातात. छोट्या-मोठे या दिंड्यांतील वारकऱ्यांना वारीच्या काळात अनेक अडचणींना सामना करावा लागतो. या वारकऱ्याची गैरसोय टाळण्यासाठी आगामी काळात या छोट्या दिंड्यांना एकत्रित करून या सर्व दिंड्या नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या दिंड्यासोबत एकत्र आणण्यासाठी प्रयत्नशिल राहणार असल्याचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांनी सांगितले.

## भगवानगडावरील माऊलींच्या मंदिरासाठी लालाची पाडळी ग्रामस्थांची १ कोटी १६ लाख रुपये देणगी

## २६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**भगवानगड/प्रतिनिधी**
भगवानगड श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.
श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे लालाची पाडळी येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १ कोटी १६ लाख रुपये झाली.
नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.



## मायबाप सरकार शेतकऱ्यांना सरसगट कर्ज माफी द्यावी-भीमसेन आप्पा लोमटे

**अंबाजोगाई/परवेज पटेल**
मुख्यमंत्री साहेब आपल्या महाराष्ट्र राज्यातील दुष्काळी परिस्थिती व शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत खालावलेली असुन आर्थिक स्थिती बिकट झाली असल्यामुळे त्यांचा थेट परिणाम शेतकऱ्यांचा मानसिकतेवर होत असुन आज शेतकरी आत्महत्या कडे वळले आहेत.आकडेवारी पाहता फक्त २०२४ मधील सहा महिन्यांत च जवळपास १००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे. शेतकऱ्यांना शेती करून सन्मानाने जगता यावे यासाठी आपल्या सरकारने कोणत्याही तारखेच्या किंवा सालाच्या अटी व शर्ती न लावता सरसकटपणे कर्ज माफी जाहीर करावी अशी विनंती बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने व वैयक्तिक माझ्या वतीने करण्यात येत आहे आम्हाला खात्री आहे की सन्माननीय मुख्यमंत्री साहेब हा धाडसी निर्णय घेण्याची क्षमता पाहता सन्माननीय मुख्यमंत्री साहेब तातडीने शेतकऱ्यांना न्याय देतील अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत.

## कारच्या धडकेत पोलीस अधिकारी ठार

नेकनूर/प्रतिनिधी नेकनूर-सध्या पोलीस भरती राज्यभरात सुरु असून पोलिसांवर या भरतीच्या बंदोबस्ताची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. रविवारी (दि.७) सकाळी ७ च्या सुमारास नेकनूर हद्दीत दुचाकीवरून जात असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याच्या वाहनाला कारने जोराची धडक दिल्याने यात दिंद्रुड पीएसआय श्रीधर मच्छिंदर नन्नवरे यांचा जागीच मृत्यु झाल्याची दुर्दैवी घटना घडली. कार चालक फरार झाला असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. राष्ट्रीय महामार्ग ५४८ वरून आज सकाळी पोलीस भरतीच्या बंदोबस्तासाठी सिरसाळ्याचे पीएसआय रमेश धोंडीराम नागरगोजे व दिंद्रुडचे पीएसआय श्रीधर नन्नवरे हे दुचाकी (एम. एच 23 ए.के.९३९७) वरून जात होते. यावेळी स्विफ्ट कर (एम.एच.२३ बी.सी. २१०८) नेख धडक दिल्याने यात श्रीधर नन्नवरे यांचा जागीच मृत्यु झाला तर नागरगोजे हे गंभीर जखमी झाले आहेत. घटनास्थळावरून कार चालकाने पळ काढल्याचे कळते. चंद्रकांत गोसावींची तत्परता घटना घडल्यानंतर अवघ्या काही क्षणातच नेकनूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. यावेळी गंभीर जखमी असलेल्या रमेश धोंडीराम नागरगोजे यांना उपचारासाठी बीडमधील खाजगी रुग्णालयात त्यांनी दाखल केले. तसेच अपघातातील वाहने तातडीने नेकनूर पोलीस ठाण्यात त्यांनी आणून लावली होती. गोसावी यांच्या कार्यतत्परतेमुळे नागरगोजे यांना लवकर उपचार मिळाले आहेत.

## सिंघम खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसाच्या निमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

सिंघम खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसाच्या निमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन नेकनूर येथे करण्यात आले होते. यावेळी नेकनूर ग्रामपंचायत सदस्य सय्यद साजेद आली (बाबुभाई) ग्रामपंचायत सदस्य इझारुद्दीन जागीरदार ,पंचायत समिती, मेंबर अनिल जाधव ,नवनाथ देवगुडे, तुकाराम सालगुडे (खडकेश्वर फिट ) महाद मुळे,सय्यद साहेब, सय्यद ईशान,उस्मान पठान, शाहबाज खान,शेख कैफ, मुसा खान यासह आदि कार्यकर्ते उपस्थित होते.



## प्रबुद्धनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर नागरी सुधार योजनेतून ३४ पथदिवे सुरू

**परळी /प्रतिनिधी**
राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या सहकार्यातून आणि नगर परिषदेचे गटनेते वाल्मिक कराड यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी यांनी भिमनगरचा विकास कामांनी केला कायापालट यामध्ये प्रबुद्धनगर नवीन वसाहत भागात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नागरी सुधार योजनेतून 34 पथदिवे बसविण्यात आले यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते प्रा.डॉ.विनोद जगतकर सर यांच्या हस्ते पथदिवे प्रज्वलीत करण्यात आले.




यावेळी भीम नगर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रताप समिंदरसवळे, सत्यपाल जगतकर , राज जगतकर, प्रा. राहुल जगतकर,रावसाहेब जगतकर, यांच्यावतीने मा. नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. भीमनगर भागाचा आदरणीय ना.धनंजय मुंडे च्या नेतृत्वाखाली धर्माधिकारी पाठपुराव्यामुळे गेल्या काही वर्षांपासून झपाट्यानं विकास होत आहे. दसरा मैदान उद्यान,प्रबुद्ध नगर उद्यान, त्यागमूर्ती रमाई सभागृह,शांतीवन स्मशानभूमी, सिमेंट रस्ते, पाणीपुरवठा योजना,पथदिवे तसेच शेकडो नागरिकांना प्रधानमंत्री आवास व रमाई आवास योजनेतून घरकुल प्राप्त झाले असून विकासाचा आलेख असाच वाढत आहे.
३४ पथदिवे प्रज्वलीत करताना प्रा.डॉ.विनोद जगतकर ,नगर परिषद विद्युत विभाग प्रमुख घुगे,प्रताप समिंदरसवळे, सत्यपाल जगतकर, प्रा. राहुल जगतकर,राज जगतकर, रावसाहेब जगतकर, रघुनाथ ताटे,सुयोग अवचारे, लक्ष्मण आदोडे,नियाझ टेलर, अभिजीत कांबळे, शुभम साळवे,भीमराव आदोडे, विशाल डोंगरे,साहेबराव कसबे,अनिल अवचारे,जतीन जगतकर,संदेश बनसोडे, देवा जगतकर,यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# दोन खासदारांच्या तालमीत तयार झालेले कपिल मस्के असू शकतात केज विधानसभेचे उमेदवार ?

**केज विशेष /रामदास तपसे**

लोकसभा निवडणूक संपते ना संपते तोच आता विधानसभा निवडणुकीच्या गप्पा गावागावात आणि चौकाचौकात होताना पाहायला मिळत आहेत. केज विधानसभा निवडणुक लढवण्यासाठी देखील अनेक इच्छुक सध्या तयारी करत असताना दिसत आहेत. त्यामध्ये विद्यमान आमदार नमिता मुंदडा, माजी आमदार पृथ्वीराज साठे, माजी आमदार संगिता ठोंबरे यांच्यासह मागील वेळी निवडणूक लढलेल्या डॉ अंजली घाडगे, डॉ नयना सीरसट यांच्याही नावाची जोरदार चर्चा होत आहे, परंतु असे असले तरी दोन खासदारांच्या तालमीत वाढलेले युवक नेतृत्व कपिल मस्के यांचीही उमेदवारी अचानकपणे येऊ शकते असीही दबक्या आवाजात चर्चा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून केज शहर आणि तालुक्यातील




एक प्रसिद्ध युवक नेतृत्व म्हणजे कपिल मस्के. केज शहराच्या सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये त्यांचें उल्लेखनीय असे कार्य आहे. केज ग्रामपंचायतला सदस्य म्हणून त्यांना शहरवासीयांनी संधी दिली होती. त्यानंतर नगरपंचायत मध्ये देखील



नगरसेवक म्हणून पुन्हा मतदारांनी संधी दिली होती. केजमधे अनेकदा ते निवडून आलेले असल्याने त्यांचा सर्वदूर पर्यंत मित्रपरिवार आणि हितचिंतक परिवार आहे. मागील काळामध्ये खासदार रजनीताई पाटील यांच्या माध्यमातून त्यांनी अनेक वर्षे कार्य केलेले आहे. माजी मंत्री अशोक पाटील तसेच पशुपतीनाथ दांगट यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राजकीय वाटचाल यशस्वी केलेली आहे. याबरोबरच मागील काळात केज विधानसभा निवडणुकीत डॉ अंजली घाडगे यांच्या प्रचारार्थ त्यांनी प्रमुख भूमिका घेऊन उमेदवारी पासून मतदानापर्यंत लक्षवेधी कार्य केले होते. त्यानंतर मग काही काळापासून ते आता नवनिर्वाचित खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या सोबत खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. खासदार रजनीताई पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे ते आजही लाडके आहेत यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत केज विधानसभा निवडणुकीत हेच कपिल मस्के देखील उमेदवार असू शकतात असीही चर्चा होत आहे. खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विजयासाठी कपिल मस्के यांनीही जीवाचे रान केलेले आहे. शिवाय दोन्ही खासदार त्यांच्या नावाला पसंती देऊ शकतात यामुळे केजच्या आमदारकीसाठी त्यांचीही उमेदवारी येऊ शकते असी चर्चा काही ठिकाणी सुरू आहे.

## दलित व शोषितांचा आवाज म्हणजे मानवी हक्क अभियान- मधुकर कांबळे

माजलगाव, (प्रतिनिधी) मानवी हक्क अभियान ही संघटना म्हणजे समाजातील दलित शोषित व उपेक्षित समाजाचा बुलंद आवाज असून या समाजाला मानवी हक्क यांच्या माध्यमातून त्यांचे अधिकार व त्यांचे मूलभूत प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन माजलगाव तालुका अध्यक्ष मधुकर कांबळे यांनी केले

आज माजलगाव शासकीय विश्राम गृह येथे मानवी हक्क अभियान चे ज्येष्ठ पदाधिकारी रमेश गवळी यांनी तालुका स्थरिय प्रमुख कार्यकर्त्याची बैठक आयोजित केली होती, या बैठक ला जिल्ह्यातील मानवी हक्क अभियानचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते या बैठकीमध्ये संघटनात्मक बांधणी समाजातील मूलभूत प्रश्न ते कसे हाताळता येतील तसेच वंचित उपस्थित घटकाचे सामाजिक व राजकीय प्रश्न तसेच गाव पातळी मूलभूत प्रश्न या संबंधाने चर्चा करण्यात आली, या बैठकीमध्ये दलित उपेक्षित वंचित घटकांच्या अनेक समस्या आहेत त्या संदर्भात प्रशासन व शासन पातळीवर संघर्षात्मक पद्धतीने सोडविण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली, या बैठकीत तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते, या बैठकीत येणाऱ्या काळात संघटनात्मक बांधणी, उपेक्षित व वंचित घटकांचे मूलभूत प्रश्न व राजकीय प्रश्न कसे समाजापर्यंत घेऊन जाता येतील याबाबतीत सविस्तर चर्चा केली, येणाऱ्या काळामध्ये मानवी हक्क अभियान च्या माध्यमातून राजकीय व सामाजिक प्रश्नाला घेऊन व राज्यघटनेच्या माध्यमातून जे हक्क व अधिकार दिले आहेत त्या संबंधाने प्रशासन व शासनासोबत तीव्र जन आंदोलन उभा करण्याच्या संबंधात निर्णय घेण्यात आला , या बैठकीला जिल्ह्यातील ,आप्पाराव मुजमुले जिल्हा सचिव ,बडु खंडागळे, विष्णु मुजमुले ,परमेश्व अडागळे , महादेव उमाप, प्रकाश थोरात , राधे कांबळे, राजेश



थोरात, बबन खंडागळे, कचरू कांबळे,सुधाकर कांबळे, रमेश जाधव शरद लोखंडे ,बाबासाहेब मुजमुले, उल्हास मुजमुले, राहुल आव्हाड अनिकेत वाघमारे हे उपस्थित होते तसेच या बैठकीचे सूत्रसंचलन बाबासाहेब थोरात यानीं केले बैठकीमध्ये भविष्यामध्ये मानवी हक्क अभियान च्या माध्यमातून राजकीय सहभाग नोंदविण्याचा दृष्टीने व गाव पातळीवरील कार्यकर्ता घडविण्याच्या संबंधाने प्रत्येक तालुक्यामध्ये कार्यकर्ता घडविण्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात चे नियोजन करण्यात आले

## अंत्योदय योजनेंतर्गत स्वस्त धान्य दुकानातून होणार वाटप

### पैठण तालुक्यातील १ हजार ३१८ लाभार्थ्यांना मिळणार साड्या

**पैठण/चैताली औटे**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेली आचारसंहिता आता हटविण्यात आल्यामुळे स्वस्त धान्य दुकानातून अंत्योदय योजनेच्या लाभार्थी महिलांना साड्या वाटप कार्यक्रमाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. तालुक्यातील उर्वरित १ हजार ३१८ लाभार्थी महिलांना साड्या वाटप केल्या जाणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांनी दिली. जानेवारी महिन्यापासून रेशन दुकानामधून अंत्योदय योजनेच्या लाभार्थीना साड्यांचे वाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. तालुक्यात ६ हजार ६८५ लाभार्थी महिला असून यापैकी ५ हजार ३६७ लाभार्थी महिलांना रेशन दुकानातून साड्या वाटप करण्यात आलेल्या आहेत, परंतु लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या आचारसंहितेमुळे या साड्या वाटपाचे काम बंद झाले होते. मात्र, आता अचारसंहिता हटविल्यानंतर या साड्या वाटपाचा कार्यक्रम सुरू करण्याचे आदेश शासनाने संबंधितांना दिले आहेत. त्यानुसार, तालुक्यातील उर्वरित १ हजार ३१८ लाभार्थी महिलांना आता या साड्यांचा लाभ मिळणार आहे. श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा व शिवजयंती सणानिमित्ताने अंत्योदय, पीएचएच प्राधान्य कुटुंब व एपीएल शेतकरी योजनेंतर्गत ५७ हजार ६०९ कुटुंबांसाठी शासनाकडून आनंदाचा शिधा किट आल्या होत्या. या सर्व किट वाटप करण्यात आल्या आहेत. आनंदाचा शिधा शासनाकडून गणपती महोत्सव, दिवाळी गुढीपाडव्याच्या निमित्ताने वाटप केला जातो - सतीश पेंडसे, पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, पैठण

## वाढदिवसाचा खर्च सुधाकरच्या जगण्याला पत्रकारांच्या आवाहनात कांबळे ठरले दत्त



माजलगाव प्रतिनिधी गळ्याचा कर्करोग झाल्या नंतर सर्व पत्रकार सुधाकर सोनवणे यांना स्तरातून त्यांचे दुख वाटून घेतले जात असताना कॉंग्रेस अनुसूचित सेल चे जिल्हाध्यक्ष तथा परळी मतदार संघाचे निरीक्षक दत्ता कांबळे यांनी आपल्या वाढदिवसाचा खर्च ५५५५ रु सुधाकर यांच्या आरोग्यासाठी दिला. माजलगाव पत्रकार संघाच्या आवाहनानंतर त्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होते आहे. माजलगाव पत्रकार संघाचे बाळासाहेब आडागळे परमेश्वर सोळंके, अमर साळवे, प्रचंड सोळंके, अनंत घडसिंगे यांनी सुधाकर सोनवणे साठी आवाहन केले आणि अनेकांनी यास प्रतिसाद दिला. सुधाकर सोनवणे यांच्या बद्दल ची माहिती लोकाशा मधून समोर येताच सर्व क्षेत्रातून मदतीचा ओघ सुरु झाला. माजलगाव मधील पत्रकारांनी या मदत कार्यात घेतलेली भूमिका कर्त्या सुधारकाची साक्ष असल्याचे बोलले जाते आहे. दत्ताभाऊ कांबळे यांचे सामाजिक कार्य नेहमीच आदर्श राहिलेले आहे. त्यांची मदत सुधाकर साठी संजीवनी ठरणार असल्याचे बोलले जात असून कांबळे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे .

## धनगर बांधवांच्या उपोषणाला रमेश गालफाडे यांची भेट !

### पाण्याच्या टाकीवर जाऊन उपोषण कर्त्याशी चर्चा




केज/प्रतिनिधी तालुक्यातील केकतसारणी येथे धनगर समाजाला एस टी प्रवर्गातुन आरक्षण मिळावे या मागणीसाठी चार तरुण पाण्याच्या टाकीवर गेल्या सात दिवसापासुन उपोषण बसलेले आहेत.या उपोषणाला दि.०७ जुलै २०२४ रोजी बहुजन विकास परिषदचे संस्थापक अध्यक्ष रमेश तात्या गालफाडे यांनी पाण्याच्या टाकीवर जाऊन उपोषण कर्त्याशी भेट व तब्येतीची विचारपूस करत तब्बल एक तास चर्चा केली. उपोषण कर्त्याशी तब्येतची सर्वप्रथम काळजी घ्या रमेश गालफाडे तुमच्या लढयात तुमच्या सोबत आहे. उपोषण स्थळ आसलेल्या मंडपामध्ये बसत उपस्थित गावकऱ्यांशी चर्चा केली.धनगर समाजाला एस टी प्रवर्गातुन आरक्षण मिळावे ही मागणी तुमची रास्त आहे व खुप जुनी मागणी आहे.या तुमच्या सर्व मागणीला बहुजन विकास परिषदच्या वत्तीने गालफाडे यांनी पाठवा दिला.

## रमेश आडसकर यांनी उपोषणकर्ते यांची पाण्याच्या टाकीवर चढून घेतली भेट

### उपोषणकर्ते यांच्या उपोषणाची दखल घेण्याची प्रशासनाकडे केली मागणी

केज- सचिन भालेराव केकतसारणी ता केज येथे सुरू असलेल्या उपोषणाला माजलगाव विधानसभा मतदार संघाचे नेते मा. रमेशराव आडसकर साहेब यांनी भेट घेऊन गावकऱ्यांशी संवाद करून नंतर पाण्याच्या टाकीवर जाऊन उपोषण कर्त्याशी चर्चा करून प्रशासनाला या आंदोलनाची दखल घेण्याची विनंती केली आहे. धनगर समाजाला एस टी प्रवर्गातुन आरक्षण मिळावे या मागणीसाठी चार तरुण पाण्याच्या टाकीवर गेल्या सहा दिवसापासुन उपोषण चालु आहे. दि. ६ रोजी उपोषण स्थळी जाऊन सर्व गावकरी व उपोषण कर्ते तरुण यांच्याशी जवळपास दोन तास सकारत्मक चर्चा करून पाण्याच्या टाकीवर जाऊन उपोषणकर्ते यांच्याशी चर्चे दरम्यान मा. जिल्हाअधिकारी बीड यांना फोन करत आमरण उपोषण स्थळी भेट द्यावी अशी विनंती केली असता मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी मी दि. ७ रविवार रोजी



उपोषणकर्त्यांच्या भावना समक्ष उपस्थित राहून यातुन काही सकारात्मक विचार होईल या साठी प्रयत्न करू असे सांगितले . मा. आडसकर साहेब उपोषण स्थळी आल्याचे केकत सारणी येथे येणार आसल्याचे समजल्यावर परिसरातील धनगर समाजातील बांधव मोठया संख्येने उपस्थित होते. प्रथम मा . आडसकर साहेबांनी उपोषण स्थळ आसलेल्या पाण्याचा टाकीजवळ आसणाऱ्या मंडपामध्ये बसत उपस्थित धनगर समाजातील लहाण थोरा सोबत चर्चा केली व नंतर पाण्याच्या टाकीवर चडत जाऊन उपोषणास बसलेले आनंद राजेभाऊ धायगुडे . संदिप धोंडीराम धायगुडे. अंकुश मन्नाडे आणि इतर एक उपोषण कर्त्यांना चर्चा करून त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली आपण पालकमंत्री महोदय यांना भेट देण्याचीही विनंती करू. आपण आपल्या तब्येतेची सर्वप्रथम काळजी घ्या अम्ही या लढ्यात तुमच्या सोबत आहेत. धनगर समाजाला एस टी प्रवर्गातुन अरक्षण मिळावे ही मागणी तुमची रास्त आहे व खुप जुनी मागणी आहे. तुम्ही अम्ही सर्व मिळुण ही मागणी आपल्या पदरात पाडुण घेवु आसे या वेळी मा. रमेशराव आडसकर साहेब यांनी उपोषण साठी बसलेल्या तरुणाना सांगितले तर आडस प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर व त्यांचे सहकारी यांना फोन करुण बोलवत ते येईपर्यंत थांबुन उपोषनास बसलेल्या तरुणांना सलाईन लावण्याचे व उपोषण कर्त्यांना आपण सलाईन घ्यावे ही विनंती केली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077